सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता व्यवस्थापकीय अनुदान, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) मंजूर करण्याबाबत.
महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ (मर्यादित)

महाराष्ट्र शासन
विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांक-इमाव-२०१९/प्र.क्र.५८/महामंडळे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:-३०/०३/२०१९

संदर्भ :- १. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. ०२/०४/२०१८
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.- अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २५/०१/२०१९
३. शासन निर्णय, समक्रमांक दि. ०८/०८/२०१८

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे मार्फत इतर मागास वर्ग यांच्या आर्थिक उन्नतीसाठी विविध योजना राबविण्यात येतात. या महामंडळास सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरीता व्यवस्थापन व प्रशासनावरील खर्च भागविण्याकरीता मागणी क्र. झेडजी-३, (०३) स्वयंसेवी संस्थंना सहायक अनुदान, (०३) (०१) महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्ग वित्त व विकास महामंडळाला सहायक अनुदान (अनिवार्य) २२२५ई८५७ अंतर्गत ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी रु. २,०८,००,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी आठ लक्ष फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे. मंजूर अनुदानाच्या ७० टक्के रु. १,४५,६०,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पंचेचाळीस लक्ष साठ हजार फक्त) रक्कम उपरोक्त उपरोक्त संदर्भ क्र. ३ येथील दि. ०८/०८/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये, महामंडळास वितरित करण्यात आली आहे. सन २०१८-१९ करिता "२२२५ ई ८५७" अंतर्गत ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) साठी रु. १,८७,२०,०००/- इतकी सुधारित तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे सुधारित अंदाजांच्या मर्यादेत म्हणजेच (रु. १,८७,२०,०००/- वजा रु. १,४५,६०,०००/-) रु. ४१,६०,०००/- इतका निधी महामंडळास वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ (मर्या.) या महामंडळास व्यवस्थापन व प्रशासनावरील जानेवारी, २०१९ ते मार्च, २०१९ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी सन २०१८-१९ मध्ये "२२२५ ई ८५७" अंतर्गत ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) अंतर्गत रु. १,८७,२०,०००/- इतकी सुधारित तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे सुधारित अंदाजांच्या मर्यादेत म्हणजेच (रु. १,८७,२०,०००/- वजा रु. १,४५,६०,०००/-) एकूण रु. ४१,६०,०००/- एवढे सहायक अनुदान खालील अटींच्या अधीन राहून महामंडळास वितरित करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.-

१. योजनेतर निधीतील खर्चासाठी शासनाने ठरविलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात आणावेत.

२. व्यवस्थापनावरील खर्च मर्यादित ठेवण्याच्या दृष्टीने कामकाजात सुसूत्रता आणावी.

३. विविध बाबींवर खर्च केलेल्या रकमांची तपशीलवार माहिती व त्यावर केलेला खर्च याची सविस्तर माहिती शासनास सादर करावी.

४. कार्यालयीन खर्चात काटकसर करावी.

५. महामंडळाने कर्जाच्या वसुलीचे प्रमाण प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न करावेत.

६. सदर योजनेचा निधी उपयोगिता प्रमाणपत्रे तपासण्याच्या अधीन वितरीत करण्यात येत आहे.

०२. उपरोक्त निधीचा खर्च करतांना संबंधित अधिकाऱ्यांनी सर्वसाधारण वित्तीय नियम, योजनेच्या अटी व शर्ती, CVC मार्गदर्शक सूचना, CAG निरीक्षणे इ. अनुपालन करून निधीचा विनियोग करावा.

०३. संदर्भ क्र. १ येथील वित्त विभागाच्या शासन परिपत्रका सोबतच्या तपासणी सूचीमध्ये नमुद केल्यानुसार सदर महामंडळाकडूनअटींची पुर्तता करण्यात आली आहे.

०४. वरील अनुदानाबाबत सह सचिव/ उप सचिव (अर्थसंकल्प), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम आहरित करण्यासाठी , कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), आहरण व संवितरण अधिकारी, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त व विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांस संवितरीत करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

०५. याबाबीवर खर्च मागणी क्र. झेडजी-३, (०३) स्वयंसेवी संस्थंना सहायक अनुदान, (०३) (०१) महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्ग वित्त व विकास महामंडळाला सहायक अनुदान (अनिवार्य) २२२५ई८५७, ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखली खर्ची टाकून सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागवावा.

०६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९ /अर्थ-३, दि. ०८/०८/२०१८ व दि. २५/०१/२०१९ अन्वये दिलेल्या अधिकारीतेत निर्गमित करण्यात येत आहे.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३०१६४५१९७८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by Shri Ravindra Gurav
Date: 2019.03.30 16:47:16 +05'30'

(रविंद्र गुरव)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे

२. सह सचिव /उप सचिव (महामंडळे) , सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई

३. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण, कोकण भवन, नवी मुंबई (दोन प्रती)

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, चेंबूर, मुंबई

५. महालेखापाल (ले व अ) महाराष्ट्र -१ व २, मुंबई/नागपूर

६. महालेखापाल (ले.प.) महाराष्ट्र -१ व २, मुंबई/नागपूर

७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / जिल्हा कोषागार अधिकारी मुंबई /ठाणे

८. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई

९. अप्पर कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई

१०. वित्त विभाग (का- व्यय-१४/अर्थोपाय/अर्थसंकल्प-३/साउ) मंत्रालय, मुंबई

११.सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई

१२. सह सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.

१२. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई

१३. निवडनस्ती (महामंडळे) विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग,मंत्रालय, मुंबई